''स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन शाखेतील आचार्य पदवी प्रबंधातील उल्लेख विश्लेषणांचा अभ्यास''

संशोधन आराखडा सादर

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र (आतंर विद्याशाखीय)

पीएच.डी. साठी

:: संशोधक ::

श्री. किरण रंगनाथ भिसे
ग्रंथपाल
दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर

:: मार्गदर्शक ::

डॉ. विक्रम व्ही. गिरी
ग्रंथपाल
शहीद भगतसिंग महाविद्यालय, किल्लारी
ता. औसा, जि. लातूर

२०२०

''स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन शाखेतील आचार्य पदवी प्रबंधातील उल्लेख विश्लेषणांचा अभ्यास''

प्रस्तावना :

ग्रंथालय आणि माहितीशास्त्रात बिब्लियोमॅट्रिक्स (Bibliometic) तंत्राची निमिर्ती ब्रॅडफर्ड यांनी मांडलेल्या विषय विस्तार सिंध्दाताच्या अनुषंगाने झाली. या तंत्राचा उपयोग राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय स्तरावर विषयाच्या विस्तार मोजण्यासाठी मोठ्या प्रमाणात केल्या जात आहे. या पध्दतीद्वारे लिखित संप्रेषण क्रियेत संशोधकासमोर येणाऱ्या अडचणी दूर केल्या जाऊ शकतात. कारण संशोधकाने संशोधन करण्यासाठी संग्रहीत केलेली माहिती ही वेगवेगळ्या स्वरूपात असते. त्यामुळे योग्य व्यवस्थापकीय निर्णय घेणे शक्य होत नाही.

कांही भारतीय तज्ञानेही बिब्लियोमॅट्रिक्स सहाय्याने संशोधन केले आहे. यामध्ये जे. जे. नारायणा त्यांचे संशोधन महत्त्वपूर्ण आहे. तसेच एम. बी. पाटील यांनी युज ॲण्ड युजस्टडी मध्ये सायटेशन ॲनालेसेस द्वारा विषय विस्ताराचा सिध्दांत आणि युजफुल ही संकल्पना मांडली. विज्ञानातील इतर शास्त्राप्रमाणे ग्रंथालय देखील आता फक्त गृहितके आणि अनुमानावर आधारीत राहिलेले नाही. ग्रंथालय आणि माहितीशास्त्रामध्ये मोठ्या प्रमाणात बदल घडून आले आहेत. यामध्ये माहितीचे विविध पध्दतीने विश्लेषण करता येते. संख्यात्मक पध्दत अशाच प्रकारे ज्ञानाच्या गुणधर्माच्या संख्यात्मक विश्लेषणासाठी बिब्लियोमॅट्रिक्स हे तंत्र ग्रंथालय आणि माहितीशास्त्रामध्ये उदयास आले.

बिब्लियोमॅट्रिक्स संकल्पनेचा उदय :

१९१७ मध्ये प्रथम Cole & Eale यांच्या संशोधनात्मक प्रबंधामध्ये (The History of comparative Anotony) असे म्हटले गेले. संख्यात्मक विश्लेषण हे biblometrics चा पहिला अभ्यास आहे. १९२३ मध्ये ह्युम यांनी Statistical Biblography ही संकल्पना मांडली. ही संकल्पना त्यांनी कार्यरत असणाऱ्या माहितीचा आणि कार्यरत नसणाऱ्या माहितीचा अभ्यास करण्यासाठी वापरले. त्याने Scientific Litrature या इंटरनॅशनल कॅटलॉगचा अभ्यास केला. यामध्ये त्यांनी लेखक आणि नियतकालिकांचा समावेश केला होता. जर्मनी हा देश सायंटिफिक लिटरेचरच्या उदयास १९९० आणि ९३ या कालावधीमध्ये पहिला क्रमांकावर होता.

व्याख्या :

बिब्लियोमॅट्रिक्स हे प्रकाशित ज्ञानाच्या गुणधर्माच्या (Properties) संख्यात्मक विश्लेषणात्मक तंत्र आहे. ती एक माहिती प्रणालीची शाखा आहे. ग्रंथ आणि ग्रंथेत्तर साहित्यात मुख्यत्वे करून नियतकालिकामधून झालेला एखाद्या विषयाचा प्रकाशन विस्तार (Subject Scater) लेखकांच्या संदर्भनिर्मितीच्या रीती (citation Petherns) लेखकांचे लेखनातील उत्तरदायित्त्व (Authorship Patterns) ग्रंथालयाचा उपयोग करण्याची उपभोक्त्यांची प्रत्यक्ष कार्यपध्दती (Actual Information Behaviour) त्यायोगे कळून येणाऱ्या माहितीविषयक गरजा Information Needs याचा अभ्यास संख्यात्मक विश्लेषणाद्वारे करण्यात येतो. तसेच बिब्लिओमेट्रिक्स कप्लिंग, को-सायटेशन, अब्सोलेसन्स, हाफलाईफ या माहिती प्रणालीतील इतर संकल्पनाचा अभ्यासही बिब्लिओमेट्रिक्स मध्ये करण्यात येतो. जे. जे. नारायणा यांनी बिब्लिओमेट्रिक्सद्वारे साहित्यात होणारी वाढ, लेखकांची सर्जनशीलता आणि त्यांच्या विचाराचा इतर लेखकांवर पडणारा प्रभाव, दोन ज्ञानशाखामधील परस्परसंबंध, ग्रंथसंग्रहाच्या विकासाचा आणि संग्रहाची उपयुक्तता या गोष्टींचा अभ्यास केला जातो.

ग्रंथालयासंदर्भात उपयोगात आणले जाणारे संख्यात्मक तंत्र हे पूर्वी सांख्यिकीय ग्रंथसूची म्हणून ओळखले जात असे ॲलन पिचर्ड यांच्या मते गणित आणि सांख्यिकीय पध्दतीचा ग्रंथ आणि प्रसार माध्यमासंदर्भातील ॲप्लीकेशन किंवा अवलंब म्हणजे बिब्लिओमेट्रिक्स होय.

बिब्लिओमेट्रिक्सचा उद्देश प्रलेखांची उपयोगिता, ग्रंथालयातील स्टॉक व ग्रंथालयाचे उपभोक्ते यांच्या संदर्भातील प्रक्रिया सांख्यिकीय वितरणांच्या दृष्टीकोनातून परिक्षण हा आहे. यामुळे ग्रंथालय आणि माहिती केंद्रातील आणि माहितीची हाताळणी यांची संख्यात्मक विश्लेषणात्मक माध्यमातून वैशिष्ट्ये आणि ग्रंथालयातील स्टॉफ व वाचक यांच्या ग्रंथालयासंदर्भातील वर्तणुकीचा मूल्यमापनात्मक अभ्यास करण्याच्या दृष्टीकोनातून मदत होते.

२. ब्रिटीश स्टँडर्ड इन्स्टिट्युटच्या मते, ''प्रलेखाच्या उपयोगासंदर्भात आणि प्रकाशन निर्मितीच्या रीतीचा अभ्यास करणे ज्यामध्ये गणितीय व सांख्यिकीय पध्दतीचा अवलंब केला जातो.''

३. हाकिन्सनच्या मते, ''वाडमयाच्या ग्रंथसूचीय वैशिट्या संदर्भातील संख्यात्मक विश्लेषण होय.''

४. पॉटर यांची व्याख्या ''लिखित संदेश वहनाचे सर्व प्रकार व लेखकांच्या वाडमय निर्मितीचा रितींचा मोजमापनात्मक अभ्यास म्हणजे बिब्लिओमेट्रिक्स होय.''

बिब्लिओमेट्रिक्स उद्देश व व्याप्ती :

लिखीत संदेश वहनाच्या प्रक्रियेवर तसेच त्यांच्या विविध घटकांच्या मोजमापन आणि विश्लेषण संदर्भातील स्वरूप व क्रियात्मक बाबीवर प्रकाश टाकणे.

ज्ञानाच्या रचना व संदेश वहनासंदर्भात माहिती देणे.

वर्णनात्मक व वर्तणूक बिब्लिओमेट्रिक्स असे वर्गीकरण करण्यात येते. वर्णनात्मक बिब्लिओमेट्रिक्स हे साहित्याच्या वैशिष्ट्याचे वर्णन करते तर वर्तणूक बिब्लिओमेट्रिक्स साहित्य निर्मीती घटकांतील परस्पर संबंधाचे परीक्षण करते.

बिब्लिओमेट्रिक्सच्या व्याप्तीमध्ये साहित्याअंतर्गत संबंधाचा अभ्यास (सायटेशन ॲनॅलिसीस) किंवा वाडमयाचा वर्णनात्मक अभ्यास यांचा समावेश होतो. या वर्णनात्मक अभ्यासामध्ये प्रामुख्याने साहित्य निर्मितीची रिती, ज्यामध्ये लेखक नियतकालिके विषय व भाषा यांचा समावेश होतो.

हे एक संख्यात्मक शास्त्र असून त्यांचे दोन भागात विभाजन करण्यात आले आहे.

अ) वर्णनात्मक बिब्लिओमेट्रीक्स ब) मूल्यमापनात्मक बिब्लिओमेट्रिक्स

सायटेशन ॲनॉलिसिस :

ज्ञानाचे संप्रेषण संदर्भ विरहीत होत नाहीत म्हणून प्रत्येक लेखक आपल्या लेखनात आवश्यक तेथे आशयाशी संबंधीत असा संदर्भ तयार करीत असतो. प्रबंध आणि शोध निबंध यामध्ये संशोधकाने किंवा लेखकाने व्यक्त केलेल्या विचारांना आणि मतांना आधि निश्चित झालेल्या सिध्दांताचा आणि सूत्रांचा संबंध असतो. संशोधनात उपयोजिलेल्या पध्दती आणि तंत्रे यांच्या समर्थनार्थ आणि प्रयोगामध्ये अवलंबवलेली सूत्रे आणि वापरलेली यंत्रे आणि उपकरणे यांच्या पुष्ट्यार्थ प्रत्येक लेखक त्यांच्या आधीच्या लेखकांचा आधार घेत असतो. त्याचप्रमाणे आधीच्या लेखकांची मते खोडून काढण्यासाठीच तो त्यांचा उल्लेख लेखनात करीत असतो. लेखनातील अशा सर्व उल्लेखांची लेखाच्या शेवटी संदर्भसूची (References) दिलेली असते. हे जे सर्व उल्लेख असतात. त्यांना इंग्रजीमध्ये सायटेशन म्हणतात. ज्या लेखकांचा आणि लेखाचा उल्लेख होता त्यांना अनुक्रमे cited Author & cited doculment असे म्हणतात.याच्या उलट जे लेखक अशा आधी प्रकाशीत झालेल्या लेखांचा उल्लेख करतो. त्यांना citing Author म्हणतात. ज्या लेखात उल्लेख केलेला असतो त्यांना citing document म्हणतात. उल्लेख करणारा लेखक आणि उल्लेखीत लेखक किंवा ज्या प्रलेखात उल्लेख करण्यात आला तो प्रलेख आणि उल्लेखित प्रलेख त्यांच्यातील संबंधाचा अभ्यास म्हणजे सायटेशन ॲनॉलिसीस होय.

वरीलप्रमाणे ग्रंथ आणि ग्रंथेत्तर साहित्यात सुध्दा मुख्यत्त्वेकरून नियतकालिकामधून झालेला एखाद्या विषयाचा विस्तार लेखकांच्या संदर्भ निर्मितीच्या रिती, लेखकाचे उत्तरदायित्व ग्रंथालयाचा उपयोग करण्याची उपभोक्त्यांची प्रत्यक्ष कार्यपध्दती आणि त्यायोगे कळून येणाऱ्या त्यांच्या माहिती विषयक गरजा यांचा अभ्यास बिब्लिओमेट्रिक्स मध्ये संख्यात्मक विश्लेषणाद्वारे करण्यात येतो. हे जे संख्यात्मक विश्लेषण आहे, त्यालाच सायटेशन ॲनॉलिसिस म्हणतात. तसेच बिब्लिओमेट्रिक्स कप्लिंग, को सायटेशन, ॲब्सेलेसन्स आणि हाफ लाईफ या संकल्पनांचा अभ्यास सायटेशन ॲनॉलेसिस मध्ये केला जातो. थोडक्यात बिब्लिओमेट्रिक्स आणि सायटेशन ॲनॉलिसिस या समानार्थी संज्ञा आहेत. प्रकाशित किंवा आधीच अस्तित्त्वात असलेल्या माहितीचे संशोधक आपल्या संशोधनाचे हेतूपरत्वे वेगळ्या दृष्टीकोनातून विश्लेषण करतो. तेव्हा त्याला संशोधनाच्या भाषेत सेकंडरी ॲनॉलिसिस म्हणतात. सायटेशन ॲनॉलिसिसमध्ये सुध्दा अस्तित्त्वात असलेल्या वेगळ्या दृष्टीकोनातून विश्लेषण होत असल्याने ते सेकंडरी ॲनॉलिसिस आहे. त्याचप्रमाणे युजर रिसर्च मधील युजस्टडी हा सुध्दा सेकंडरी ॲनॉलिसिस मध्ये मोडतो.

लेखक एखादा लेख लिहित असताना आपलया लेखात दुसऱ्याच्या लिखित साधनांख त्यांनी उपयोगात आणलेल्या, संदर्भ घेतलेल्या इतर माहितीचा उल्लेख करत असतो. यालाच (citing) किंवा (Referencing) म्हणतात. ज्या प्रलेखाचा आपण संदर्भ म्हणून उल्लेख करतो. त्यास उल्लेखित प्रलेख असे म्हणतात. तसेच ज्या प्रलेखात उल्लेख केला जातो. त्याला उल्लेखनार प्रलेख असे म्हणतात. तांत्रिक लेखनाकरीता देण्याची ही एक जुनी परंपरा आहे. व्हाईट (१९८५) मिल्नीस आणि सिमेस (१९८९) यांनी citation चा विकास दर्शविला आहे. ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरी मध्ये ८८ संदर्भाचा तसेच याचा वापर बायबल या धार्मिक ग्रंथात केल्याचे आढळून येते.

ब्रिटेन आणि लायन यांच्या मते, मुळ प्रलेखात शोध घेणे आणि त्यावरून मुळ मासिके बनविणे, प्राथमिक मासिकांचे क्षेत्र अभ्यासणे, साहित्यवाढीचे प्रमाण, संदर्भाचा वापर तसेच कालबाह्य साहित्य अभ्यासणे. बैगमन (१९७४) यांच्या मते, उल्लेख हे दोन प्रलेखातील संबंध प्रस्थापित करणे होय. हे अशाप्रकारे दर्शविते की सायटेशन हे साहित्य उपयोगाचे निर्देशक होय.

➢ संशोधन लेख लिहिताना लेखक इतर लेखकांच्या साहित्याचा संदर्भ म्हणून उल्लेख करतात त्यास सायटेशन म्हणतात.

➢ संशोधन करताना संशोधकाने जर विद्वान लेखकांचा लेख आपल्या संशोधनात लिहिला तर त्याचा संदर्भ देण्याच्या पध्दतीस (citation) असे म्हणतात. ते लेखाच्या खाली किंवा प्रकरणाच्या शेवटी दिले जातात.

उल्लेख विश्लेषण या पध्दतीचा विश्लेषणाचा संबंध हा कुणाच्या साहित्याचा संदर्भ उल्लेख करतो यांच्याशी आहे. साधारणतः उल्लेखांचा अभ्यास करून निष्कर्ष काढणे सोपे नाही. परंतू मागील ३०० वर्षापूर्वीच्या कालाखंडानुसार जे शास्त्रीय लिखान दर्शवितात त्यानुसार Derel De Spllu Price यांनी उल्लेखनाला सुरूवातीला Scholia नाव दिले. ज्याचा अर्थ विद्तेशी संबंधीत असा होतो. उल्लेख हा नेहमीच माहितीचा स्त्रोत म्हणून ओळखले जातात. उल्लेखाचा उपयोग ग्रंथसूचीकार, इतिहासकार, ग्रंथपाल, प्रलेखन अधिकारी इत्यादी चांगल्या प्रकारे करतात.

संशोधन विषयाची निवड :

संशोधन विषय निश्चित झाल्यानंतरच संशोधन कार्याला प्रत्यक्ष स्वरूपात होत असते. संशोधन विषयाची वास्तविकता, सद्यःस्थिती अभ्यासणे गरजेचे असते. माहितीची उपलब्धता मोठ्या प्रमाणात असल्याने विविध विषयांनी मासिके, संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रे, पीएच.डी. प्रबंध, पेटंट, प्रमाणके व गॅजेट इत्यादीचा वापर हा माहितीचा शोध घेण्यासाठी केला जातो. म्हणून सदरील विषयामध्ये कोणत्या साधनांचा कितपत वापर केला आहे. कोणत्या साहित्याचा वापर जास्त केला आहे, हे जाणून घेणे गरजेचे वाटते. सदर विद्यापीठातील वाणिज्य शाख्येतील मुख्य बाबी संदर्भात प्रस्तूत विषयाची वस्तूस्थिती संशोधन कार्याच्या माध्यमातून अभ्यास करण्यासाठी आणि संशोधनाची सुक्ष्म साधने जाणून घेण्यासाठी संशोधकाने ''स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन शाखेतील आचार्य पदवी प्रबंधातील उल्लेख विश्लेषणांचा अभ्यास'' हा संशोधन विषय म्हणून संशोधकाने निवडला आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड :

गोदावरी नदीच्या काठावर वसलेले शहर म्हणजे नांदेड होय. त्याचप्रमाणे श्री गुरू गोविंदसिंघजी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नांदेड नगरीत १७ सप्टेंबर १९९४ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची स्थापना झाली आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठाची निर्मिती मराठवाडा विद्यापीठाच्या विभाजनातून झालेली आहे. हैद्राबाद मुक्ती संग्रामाचे थोर सेनानी स्वामी रामानंद तीर्थ यांचे नाव या विद्यापीठास देण्यात आले आहे. स्वामी रामानंद यांनी मराठवाडा स्वतंत्र होण्याअगोदर निजामाच्या राजवटीत असताना आपले शैक्षणिक व सामाजिक कार्य मोठ्या प्रमाणात केले

होते. समाजात शिक्षणाची सुरूवात करण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले होते. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामी राजवटीतून हैद्राबाद संस्थान मुक्त झाले. हैद्राबाद मुक्ती संग्रामात सहभागी झालेल्या सैनिकांचे सतत स्मरण व्हावे यासाठी विद्यापीठाचे व कल्पक कुलगुरू डॉ. १७ सप्टेंबर हा विद्यापीठाचा स्थापना दिवस ठरविला.

डॉ. जनार्धन वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली जून १९९५ पासून विद्यापीठाची शैक्षणिक वाटचाल सुरू झाली. या विद्यापीठाने सुरूवातीपासून विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानला व विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यासाठी नियोजनबध्द असा शैक्षणिक कार्याचा आराखडा तयार केला. हा आराखडा तयार करत असताना केवळ मळलेल्या वाटेने न जाता २१ व्या शतकाची आव्हाने पेलू शकणारा विद्यार्थी घडविण्यासाठी विद्यापीठाने जाणीवपूर्वक काही नव्या दिशा शोधण्याचा प्रयत्न केला. सदर विद्यापीठाचा एकूण परिसर ६५० एकर मध्ये विस्तारलेला असून विद्यापीठ परिसराला ज्ञानतीर्थ हे नाव डॉ. जनार्धन वाघमारे यांनी दिले आहे. विद्या ही मानवाला अंधारातून उजेडाकडे किंवा अज्ञानाकडून ज्ञानाकडे नेण्याचा मार्ग आहे म्हणून ''सा विद्या या विमुक्तये'' हे विद्यापीठाचे बोधवाक्य ठरविले. विद्यापीठाचा कारभार सुव्यवस्थित चालण्यासाठी व्यवस्थापन परिषद, विद्या परिषद, विविध कार्यालये, परीक्षा भवन, विद्यापीठ व्यवस्थापन सभागृह व प्रशासकीय इमारत इत्यादी विभागांची निर्मीती केली आहे. हे विद्यापीठ मराठवाड्यातील दुसरे अकृषी विद्यापीठ आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रात सुरूवातीला नांदेड, लातूर व परभणी या जिल्ह्यांचा समावेश होतो नंतर हिंगोली जिल्हा झाल्यानंतर या जिल्ह्याचा समावेश या विद्यापीठ कार्यक्षेत्रात करण्यात आला.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

संशोधन विषयाची निवड झाल्यानंतर संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा निश्चित केली पाहिजे. सदरील संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा ही स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ स्थापनेपासून ते डिसेंबर २०२० पर्यंत वाणिज्य व व्यवस्थापन शाखे अंतर्गत सादर केलेल्या पीएच. डी. प्रबंधाचे उल्लेख विश्लेषण करण्यात येणार आहे. सदरील संशोधन विषयासाठी फक्त वाणिज्य शाखेतील पीएच.डी. प्रबंधाच्या उल्लेखसूचीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

संशोधनाची सुरूवात ही संशोधनाची उद्दिष्ट्ये समोर ठेवून संशोधन कार्याला सुरूवात केली जाते. संशोधनाला योग्य दिशा मिळावी तसेच संशोधन हे हेतू पूर्ण करणारे असावे. सदरील संशोधन विषयासाठी संशोधकाने खालील उद्दिष्ट्ये निश्चित केलेली आहेत.

➢ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठास वाणिज्य व व्यवस्थापन शाखेअंतर्गत सादर केलेल्या पीएच. डी. प्रबंधाचे ग्रंथ सूचीय व विषयाप्रमाणे विश्लेषण करणे.

➢ उपरोक्त प्रबंधाचे व उल्लेखांचे सांख्यिकीवर ग्रंथ मितीय सूत्राचे उपयोजन तपासणे.

➢ संदर्भीत प्रलेखांचे प्रकार (फॉर्मनुसार) शोधणे.

➢ संदर्भीत प्रलेखांचे कालक्रमानुसार वितरण अभ्यासणे.

➢ संदर्भीत प्रलेखांचे लेखकत्व पॅटर्न शोधण्यासाठी

➢ संदर्भीत मासिकांचे / रॅंक जाणून घेणे

➢ संदर्भीत पुस्तकांचे क्रमवारी / रॅंक जाणून घेणे

➢ संदर्भीत पुस्तकांचे क्रमवारी / रॅंक समजून घेणे

➢ संदर्भीत केलेल्या प्रलेखाची / कागदपत्रांची भाषावर वितरण शोधणे

➢ भारतीय व परदेशातील उल्लेखांचे वितरण जाणणे

➢ संदर्भीत वेब - संशोधने क्रमवारी अभ्यासणे

➢ संशोधकांनी प्रबंधामध्ये वापरण्यात आलेल्या लेखकांचे उत्तरदायित्व अभ्यासणे

➢ उल्लेख विश्लेषणांचा अभ्यास ग्रंथमापन संशोधन पध्दतीनुसार अभ्यासणे.

➢ प्रबंधामध्ये वापरण्यात आलेल्या साहित्याचे प्रकाशन वर्ष, स्थळ, लेखकांची व शीर्षकांची प्राधान्यक्रम सूची तयार करणे.

➢ ग्रंथ व नियतकालिके यांच्या वापरावरून हाफ लाईफ ठरविणे.

गृहितकृत्ये :

गृहित्यकृत्ये ही संशोधनाचा केंद्रबिंदू मानला जातो. संशोधन पूर्ण होण्या आधीच जी संभाव्य उत्तरे धरली जातात. त्यास गृहित्यकृत्ये संबोधले जाते. प्रस्तूत संशोधन विषयासाठी संशोधकाने खालील गृहित्यकृत्ये निश्चित केली आहेत.

- पुस्तके जास्तीत जास्त उध्दृत करणारे मुख्य प्रलेख आहेत.
- संशोधनासाठी मराठी भाषा ही प्रभावी व प्रबळ आहे.
- बहुलेखक हे एका लेखकापेक्षा अधिक प्रभावी आहेत.
- संशोधक भारतीय प्रकाशनास जास्त प्राधान्य देतात.
- पुरूष संशोधक त्यांच्या विषय क्षेत्रात महिला संशोधकांपेक्षा प्रबळ आहेत.
- इलेक्ट्रॉनिक स्त्रोतांचा वापर प्रबंधामध्ये कमी प्रमाणात केलेला आहे.

संशोधन पध्दती, तंत्रे व साधने :

संशोधनास इंग्रजीमध्ये रिसर्च (Research) असे म्हणतात. पुनः पुन्हा (Re) आणि (search) शोधणे यावरून रिसर्च (Research) म्हणजे पुन्हा शोधणे / तपास करणे/ संशोधन करणे, असा अर्थ होतो.

व्यक्तीला एखाद्या वस्तूचा घटनेच्या बाबतीत सर्वच माहिती असेल असे नाही, त्यासाठी व्यक्तीचे शोध घेण्याचे प्रयत्न अखंड चालू आहेत. ज्ञानाची वृध्दी करणे, अस्पष्ट ज्ञानाचे स्पष्टीकरण करणे आणि विद्यमान ज्ञानाची सत्यता पडताळणे. हे संशोधनाचे उद्देश आहेत. मानव हा बुध्दीजीवी व जिज्ञासूवृत्तीचा प्राणी असल्यामुळे तो नवीन ज्ञानाचा शोधात असतो. संशोधनाकरीता गृहितकृत्याचे परिक्षण करणे, नवीन घटनांचा शोध घेणे, विशिष्ट घटनांचा शोध घेणे, विशिष्ट घटनांमधील नवीन संबंध शोधण्याच्या उद्देशाने कोणत्यातरी संशोधन पध्दतीचा उपयोग करणे, हा संशोधनाचा अर्थ आहे.

वेबस्टर डिक्शनरीनुसार ''संशोधन म्हणजे कोणत्याही ज्ञानशाखेत नवीन तथ्य शोधण्यासाठी आणि जुनी तथ्ये आणि तत्त्वे परिक्षणासाठी केलेला चिकित्सक व पध्दतशीर अभ्यास होय.''

चार्ल्स बुशा आणि स्टिफन हार्टर यांच्या मते, ''संशोधन म्हणजे ज्ञानप्राप्तीसाठी घेतलेला शोध होय.''

डॉ. कांयदे-पाटील यांच्या मते, ''संशोधन हा शब्द इंग्रजीतील Re-search या शब्दापासून प्रसिध्द आहे. Re म्हणजे पुन्हा आणि search म्हणजे शोध घेणे किंवा झालेला संशोधनावर पुनःपुन्हा संशोधन करून नवीन तथ्य, नवीन सत्य आणि नवीन वस्तूस्थिती अभ्यासणे म्हणजे संशोधन होय.''

वर्णनात्मक संशोधन पध्दती :

सदरील संशोधनाकरीता वर्णनात्मक संशोधन पध्दती व ग्रंथमापन संशोधन पध्दतीचा अभ्यास करण्यात येणार आहे. त्याचबरोबर सर्वेक्षणासाठी १९९४ ते डिसेंबर २०२० पर्यंतच्या प्रबंधाचा उपयोग करण्यात येणार आहे.

वर्णनात्मक संशोधन पध्दती ही सर्व पध्दतींमध्ये अत्यंत लोकप्रिय पध्दती असून या पध्दतीचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केलेला दिसून येतो. जास्तीत जास्त ग्रंथालयीन समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. या पध्दतीच्या आधारे केवळ समस्या सोडविणे एवढेच उद्दिष्ट न ठेवता मूलभूत सिंध्दातासाठी माहिती मिळविणे, मूलभूत तत्त्व शोधणे ही देखील उद्दिष्टे ठेवली जातात. याप्रमाणेच या पध्दतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या प्रकारात प्रयोज्य ज्या स्थितीत आहे, घटक ज्या स्थितीत आहे, त्या स्थितीतच त्या प्रयोज्याचा घटकाचा विचार अभ्यास केला जातो. या स्थितीमध्ये बदल केला जात नाही.

ग्रंथालय किंवा माहिती केंद्रात नवीन तंत्रज्ञानामुळे विविध प्रकारच्या घटना घडत असतात. भूतकाळात घडून गेलेल्या गोष्टींचा वर्तमानकाळाशी संबंध असतो. वर्णनात्मक संशोधन पध्दतीमध्ये सर्वसाधारणपणे, परिकल्पना मांडणे व ती तपासणे ही प्रक्रिया होते. सर्वच प्रकारात परिकल्पना हव्यातच असा अट्टाहास नसतो. उद्दिष्टांची आवश्यकता सर्व प्रकारात असते. विविध चलांमधील संबंध पाहिले जातात. वर्णनात्मक संशोधनात घटकांच्या संबंधात जशी संख्यात्मक माहिती गोळा केली जाते. तशी गुणात्मक माहितीही गोळा केली जाते. या संशोधनातील माहितीच्या आधारे एखादा प्रायोगिक प्रकल्प हाती घेता येऊ शकेल अशी माहिती पुरविण्याचे कार्यही या प्रकारच्या संशोधनातून होते. विविध प्रकारची माहिती गोळा केल्याने संबंधीत विषयक्षेत्रात ज्ञानवृध्दी होत असते.

वर्णनात्मक संशोधनात समस्येच्या संदर्भात, माहिती गोळा करण्यासाठी प्रश्नावली, मुलाखती, कसोट्या, निरीक्षण वगैरे अनेक साधनांचा उपयोग करता येतो. माहिती कोणत्या प्रकारची हवी आहे व प्रतिसादकाचा दर्जा कसा आहे, यावर कोणते साधन वापरायचे हे ठरवावे लागते. या साधनांपैकी काही साधने संशोधक स्वतः तयार करतो. काही वेळा प्रमाणित साधनांचाही उपयोग केला जातो. या दोन्ही

प्रकारच्या साधनांची पूर्वचाचणी घेणे फायदेशीर ठरते. स्व-रचित साधनांमधील राहिलेले दोष पूर्वचाचणीद्वारे दूर होतात व प्रमाणित चाचण्या देण्याचा अनुभव संशोधकास मिळतो. ज्यायोगे प्रत्यक्ष चाचणीचे आयोजन करतेवेळी अडचणी उद्‌भवत नाहीत.

पूर्व साहित्याचा आढावा :

पूर्व साहित्याचा आढावा हा नव्या संशोधनाच्या संदर्भात उपयुक्त असतो. म्हणून संशोधकाला नव्या अभ्यास विषयाकडे नव्या दृष्टीने पाहता येते. संशोधनासाठी घेतलेला विषय प्रत्यक्ष - अप्रत्यक्षरित्या पूर्वी झालेल्या संशोधनाशी निगडीत असतो. संशोधकाने निवडलेल्या विषयाशी संबंधीत साहित्याचे वाचन व मनन हा संशोधनातील एक महत्त्वपूर्ण भाग असतो.

Ghar, V. P. (2016), "Bibliometric Study of Journal of Biosciences Published During The Year 2003 to 2014", पी. राजेंद्र (२००५), "Biblometric Analysis of fiber optics Literature" सेन बी. के. (२०१३) "Citation Generation Potentic", कुलकर्णी ए. पी. (२००९), "Indian Journal of Pharmaceutical Education And Research (1996-2006) a bibliometric Analysis".

‘‘स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन शाखेतील आचार्य पदवी प्रबंधातील उल्लेख विश्लेषणांचा अभ्यास ’’

प्रकरणाचा आराखडा

प्रकरण १ ले संशोधन विषय : विषय प्रवेश

सदरील प्रकरणामध्ये विषयाची पार्श्वभूमी, विषयाची निवड, संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहितकृत्ये, संशोधनाचे महत्त्व, संशोधन पध्दती, संशोधन विषयाची उपयुक्तता, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधनाची रूपरेषा निश्चित केली जाईल.

प्रकरण २ रे संदर्भ साहित्याचा आढावा

संशोधन विषयाशी निगडीत विचारवंतांनी, लेखकांची, समीक्षकांनी, संदर्भ ग्रंथ उपलब्ध करून दिली आहेत. त्या संदर्भ ग्रंथात संबंधित लेखकांचे विचार, मतप्रवाह लक्षात घेऊन त्यांच्या विचारांचा आढावा या प्रकरणात घेतला जाईल.

प्रकरण ३ रे माहिती संकलन

सदरील प्रकरणामध्ये संशोधन विषयाशी निगडीत उल्लेख विश्लेषणांच्या संदर्भात माहितीचे संकलन करण्यात येईल.

प्रकरण ४ थे माहितीचे विश्लेषण

सदरील प्रकरणात मूलभूत उद्देशित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले जाईल. प्राप्त आकडेवारीनुसार सारणीद्वारे वर्गीकरण करून आलेख दर्शविले जातील. तथ्यांचे गुणात्मक व संख्यात्मक विश्लेषण करून निष्कर्ष मांडण्यात येतील.

प्रकरण ५ वे समारोप, निष्कर्ष, शिफारशी आणि पुढील संशोधनास दिशा

सदरील प्रकरणात संशोधन विषयाचा सारांश नमुद करण्यात येईल. तथ्यांचे विश्लेषण व अर्थ निर्वचनानुसार ठळक निष्कर्ष मांडून, उद्दिष्ट्ये व गृहित्यकृत्ये डोळ्यासमोर ठेवून योग्य त्या मार्गदर्शक सूचना सांगण्यात येतील.

संदर्भ ग्रंथसूची :

१) रिसवडकर, म. रा., २०००, माहिती संकलन, विश्लेषण आणि सादरीकरण, नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

२) नातू, श्रीराम रघुनाथ, १९९५, माहितीसेवा आणि संघटना, नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

३) बोधनकर, सुधीर, अलोणी, विवेक, १९९९, सामाजिक संशोधन पध्दती, नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन.

४) कुंभार, राजेंद्र, २०००, महाविद्यालयीन व विद्यापीठ ग्रंथालये, नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

५) गणपुले, श. रा., १९९४, ग्रंथालय व्यवस्थापनाची मूलतत्त्वे, नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ.

६) घोटाळे, रा. ना., २००३, समाजशास्त्रीय संशोधन : तत्त्वे व पध्दती, नागपूर : श्री मंगेश प्रकाशन.

७) कुंडले, म. वा., १९९८, शैक्षणिक तत्त्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, पुणे : श्रीविद्या प्रकाशन.

८) रिसवडकर, म. रा., २०००, संशोधन : व्याख्या आणि पध्दती, नाशिक : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

९) www.srtmun.ac.in

10) Ahuja Ram, (2002), Research Method, Rawat Publication, Jaipur.

11) Allen Kent, (1984) Encyclopedica of Library and Information Science, Harpear Press, New York.

12) Aksnes, D. W. (2006), 'Citation Rates and Perceptions of Scientific Contribution', Journal of the American Society for Infomation Science And Technology.

13) Bellis, De Nicola (2009), Bibliometrics and Citation Analysis : From the Science citation Index to cybermetrics', Scarecrow Press.

14) Gooden, A. M. (2001), Citation Analysis of Chemistry Doctoral Dissertation : An Ahio State University Case Study'.

15) Kothari C. R. (2002), Research Methodoloty, Visava Publication, New Delhi

16) Kumar, P. S. G. (2004), Research Methods And Statistical Techniques', B. R. Publishing, Delhi.

17) Lal, A. & Panda, S (1996), Research Plant Pathology : A Bibliometric Analysis, Library Science With a Slant to Documentation And Information Studies.

18) Martin M. U (1968), Science Citation Index : A New Concept in Indexing, Library Tredns, Vol. 16.

19) www.inflibnet.in

20) www.bamu.ac.in

21) www.ycmou.ac.in

22) www.unipune.ac.in

दिनांक :

ठिकाण :

संशोधक	मार्गदर्शक
(किरण रंगनाथ भिसे)	(डॉ. विक्रम व्ही. गिरी)